पोलीस प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षकांना प्रोत्साहन म्हणून १ टप्पा पदोन्नती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र. पीएए [illegible]/सीआर. [illegible]/पोल-५अ

मंत्रालय, मुंबई-३२, दि. २४ ऑगस्ट, २००४

वाचा :- १) शासन निर्णय गृह विभाग, क्र. एसएसआर १०८६/२२९४१-रोजन एक-एसपीएस-४, दि. १०.११.१९८६

२) शासन निर्णय गृह विभाग, क्र. पीयूए ०३९६/सीआर-४७६/पोल-५[अ], दि. २०.११.१९९९

शासन निर्णय :- पोलीस प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षकांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिकोनातून ते प्रशिक्षक संबंधित संस्थांत कार्यरत असेपर्यंत पालेशिक तत्वावर एक टप्पा पदोन्नती देण्यास उपरोक्त क्र. २ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली आहे. सदरहू शासन निर्णयातील परिच्छेद ३ नुसार एक टप्पा पदोन्नती मिळाल्यानंतर त्यावेळी अस्तित्वात असलेले विशेष वेतन रद्द होईल असे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, वरील क्र. १ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ४ नुसार उक्त शासन निर्णयाच्या परिशिष्ट 'अ' च्या बाब क्र. III (तीन) मध्ये नमूद केलेल्या विशेष सुरक्षा प्रशिक्षण शाळा पुणे येथील प्रशिक्षण कर्मचारी / अधिकारी यांना देण्यात येणारे ३० % अतिरिक्त वेतन रद्द करण्याचा उल्लेख वरील क्र. २ च्या शासन निर्णयात करण्यात आलेला नाही. ही बाब विचारात घेऊन विशेष सुरक्षा प्रशिक्षण शाळा, पुणे येथील अधिकारी व कर्मचारी यांना दि. १०.११.१९८६ च्या शासन निर्णयानुसार देण्यात येत असलेले ३० % अतिरिक्त वेतन रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्र. ना. गौड)

सह सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग

प्रत,

- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
- अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
- महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर (प्रत्येकी तीन प्रती).
- महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर (प्रत्येकी तीन प्रती).
- संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
- पोलीस उपमहानिरीक्षक विशेष कृतिका प्रशिक्षण सत्र, वडाची वाडी, पुणे.
- पोलीस उपमहानिरीक्षक, प्रशिक्षण नागपूर
- प्राचार्य पोलीस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा/अकोला/नागपूर/जालना/नानवीज/सोलापूर/मरोळ मुंबई.
- प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.
- उप संचालक, गुन्हा अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक.
- समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट-७ (प्रशिक्षण केंद्र), नानवीज (दौंड) जिल्हा पुणे
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
- निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
- जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/अकोला/नागपूर/जालना/सोलापूर/नाशिक
- गृह विभागातील सर्व पोलीस कार्यासने,
- निवड नस्ती.